स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 29–10–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 2. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

विषय क्रमांक 253:— मा. खासदार यांचे स्थानकि विकास कार्यक्रमांतर्गत प्रभाग क्र. 36, भांडेवाडी परिसरातील सद्‌गुरु नगर, दिनबंधु सोसायटी व अंतुजी नगर येथे रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मे. पी.के.नगरार कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दराची रु. 49,93,062/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>विषय क्रमांक 254</u>:— प्रभाग क्र. 35 अ—ब विनोबा भावेनगर मध्ये डॉ. अरसपूरे ते भुजाडे हनुमानमंदिर ते भंडारारोड व महाकाळकर लॉन ते चामट शाळा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामस्ताव प्राप्त निविदापैकी मे. मुकेश कन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 3.30 टक्के अधिक दराची रू. 30,94,825/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्यासह सन 2015—16 या आर्थीक वर्षात पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कामाचा खर्च प्रशासकीय मान्यता राशीपर्यंत सिमित ठेवण्यात येईल.

<u>विषय क्रमांक 255</u>:— महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. सवैअ—2011/प्रा.क्र.626/11 सेवा 3 मंत्रालय मुंबई — 400032 दिनांक 7 ऑगस्ट 2012 या शासन निर्णयात राज्यशासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत कार्यरत असणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकारी यांना 6 व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार मूळ वेतनाच्या 35 टक्के व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रुपये 85000/— पेक्षा जास्त नसावी. सदर प्रस्ताव ज्या दिनांकास मंजूर होईल त्या दिनांकापासून व्यवसायरोध भत्ता लागू राहिल, थकबाकी देय राहणार नाही.

सदर शासन निर्णय दिनांक 07.08.2012 चे परिच्छेद 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे केवळ सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच सदर शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. त्यामुळे म.न.पा.तील कार्यरत नियमित अधिकाऱ्यांना हया व्यवसायरोध योजनेतील तरतूदी जशाचे तसे लागू करावयाचे की फेरफारसह किंवा लागू करावयाचे नाही याबाबत महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

उपरोक्त शासन निर्णयात नमूद तरतूदी नुसार म.न.पा. आस्थावनेवर असलेल्या 29 नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता लागू करण्याचे झाल्यास म.न.पा.स वार्षिक वित्तीय भार रु. 36,10,620/— वहन करावा लागेल.

सदर शासन निर्णय म.न.पा.तील नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू केल्यास शासन निर्णय दि. 07.08.2014 मधील परिच्छेद 4 नुसार खालील प्रमाणे प्रमुख 5 अटी व शर्तीसह निर्णयातील सर्व अटी व शर्ती त्यांना लागू राहतील.

1. वैद्यकीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास ते नियमानुसार कारवाईस पात्र राहतील.
2. व्यवसायरोध भत्ता लागू केला असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याला याबाबत व्यवसायरोध भत्ता न घेण्याबाबतचा विकल्प देता येणार नाही.
3. व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करणे आवश्यक राहिल.
4. व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना स्वतःच्या नावे रुग्णालय, दवाखाने चालविता येणार नाहीत किंवा नोंदणी करता येणार नाही. तसेच अन्य खाजगी रुग्णालयात किंवा दवाखान्यात जाऊन आरोग्य सेवा देता येणार नाही.
5. व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांची कोणत्याही रुग्णालय/दवाखान्यात कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भागीदारी असता कामा नये. तसेच खाजगी व्यवसाय करीत नाही, व मुख्यालयाच्या ठिकाणी राहतात. हे दरमहा प्रमाणित करणे बंधनकारक राहिल.

म.न.पा. आरोग्य विभागातील आस्थापनेवर कार्यरत असलेले सर्व नियमित वैद्यकीय अधिऱ्यांना सदर निर्णयानुसार व्यवसायरोध भत्ता लागू करण्याचे झाल्यास शासन निर्णयात नमूद सर्व अटी व शर्तीला अधीन राहून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी नुसार मूळ वेतनाच्या 35 टक्के व्यवसायरोध भत्ता लागू करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने मंजूर तसेच

धोरणात्मक निर्णय असल्यामुळे म.न.पा. सभागृहाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. म.न.पा. सभागृहाच्या मंजूरीसाठी सभागृहाकडे पाठविण्याच्या शिफारशीस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

विषय क्रमांक 256:— प्रभाग क्र. 57 मधील अपोलोस्टीक कॉलेज रिज रोड पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. सेठ कंस्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 4.50 टक्के अधिक दराची निविदा रुपये 52,23,666/— (रुपये बावन लक्ष तेवीस हजार सहाशे सहाष्ट फक्त) स्वीकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्रमांक 370 (A22001330801) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरिता रु.49,98,723/— राशीची तरतूद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 257 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर